नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २३ Issue - 23 | वार सोमवार दि. ९ जून २०२५ Blow- Monday Date 9 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# महाराष्ट्रात १२ ते २० जून दरम्यान मुसळधार पाऊस

## हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी दिली माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : यंदा मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यातच मान्सूनचे जोरदार आगमन झाल्याचं पाहायला मिळालं. महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यात मुसळधार पाऊस झाला, त्या पावसाने अनेक जिल्ह्यात शेतकऱ्यांचं नुकसान झालं असून घरातही पाणी शिरल्याचं पाहायला मिळालं. मे म हिन्यातील जोरदार पावसानंतर पावसाने दडी मारली असून राज्यभरातील बहुतांश भागात विश्रांती घेतली आहे. आज काही जिल्ह्यात ढगाळ वातावरणासह पावसाच्या सरी बरसल्या आहेत. त्यातच, मुंबई आणि मुंबई उपनगरासाठी पावसासंदर्भात एक महत्वाची बातमी समोर आली आहे. मुंबईसाठी पुढले तीन दिवस महत्वाचे ठरणार आहे. कारण, पुढील ३ तासांसाठी पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. परिणामी, मुंबई आणि उपनगरांत २ तारखेपासून पावसाने विश्रांती घेतल्यानंतर आता पुन्हा पावसाचा जोर वाढणार असल्याचे चिन्ह आहे. तर, दुसरीकडे हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी १२ तारखेच्या पुढे महाराष्ट्रात जोरदार पाऊस पडणार असल्याचे भाकीत केलं आहे.

१२ ते २० जून या कालावधी मोठा पाऊस येणार असून बीड जिल्ह्यातील तळी भरुन जाणार आहेत. कारण, जेव्हा मान्सून पूर्वेकडून येतो तेव्हा बीड, अहिल्यानगर, धाराशिव, लातूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडतो. सध्या पाऊस उघडल्याने शेतकऱ्यांनी शेतीतली सर्व कामे उरकून घ्यावी,कारण १२ ते २० जून या कालावधीत राज्यभरात मुसळधार पाऊस पडणार आहे, असा अंदाज हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे. पूर्व विदर्भ,पश्चिम विदर्भ, कोकण, खान्देश, मराठवाडा सगळीकडेच १२ जूनपासून पाऊस पडणार आहे. आजपासून या पावसाला सुरुवात होणार असून पुढील ४ दिवसांत हा पाऊस वाढत जाणार आहे. त्यामुळे, १२ तारखेपर्यंत पेरणी करू शकता, सोयाबिन पेरणाऱ्यांनी १२ तारखेच्या एक दिवस अगोदपर्यंतच सोयाबिन पेरणी करावी, असे आवाहन डख यांनी केले आहे. चंद्रपूर शहरात आज मुसळधार पावसाने हजेरी लावली असून मुसळधार पावसाने नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे. गेल्या १० दिवसांपासून चंद्रपूर जिल्ह्यात पाऊस नसल्याने तापमानात मोठी वाढ झाली होती. ४२ अंशपर्यंत



तापमान पोहोचल्यावर आज संध्याकाळी चंद्रपुरात अचानक मुसळधार पाऊस झाला. पावसाच्या मृग नक्षत्राला सुरुवात झाली असून मृग नक्षत्राच्या पहिल्याच दिवशी पावसाच्या जोरदार सरी बरसल्याने सामान्य लोकांसह शेतकऱ्यांमध्ये समाधान आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोलीत आज झालेल्या मुसळधार पावसामुळे बाजारपेठ जलमय झाली आहे. अचानक झालेल्या पावसामुळे नागरिकांची मोठी धावपळ उडाली. बाजारपेठेत पुराचे पाणी शिरल्याने अनेक दुकाने आणि रस्ते पाण्याखाली गेले आहेत. नागरिकांना पुराच्या पाण्यातून वाट काढावी लागली. पावसामुळे वाहतुकीवरही मोठा परिणाम झाला असून, काही ठिकाणी पाणी तुंबल्याने वाहनचालकांना अडचणीचा सामना करावा लागत आहे.

# सर्व शासकीय कार्यालयात सौर ऊर्जेचा वापर सुरू करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्यातील सर्व शासकीय कार्यालयात डिसेंबर २०२५ पर्यंत सौर ऊर्जेचा वापर सुरू करणार असून प्रधानमंत्री सूर्य घर योजना राज्यात प्रभावीपणे राबविणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महाऊर्जा नवीन प्रशासकीय इमारतीचे उदघाटन

महाऊर्जाच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, खासदार मेधा कुलकर्णी, खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे, आमदार भीमराव तापकीर, महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, प्रभारी विभागीय आयुक्त कविता द्विवेदी, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, महाऊर्जाच्या महासंचालक डॉ. कादंबरी बलकवडे, महाराष्ट्र राज्य वीज कंपनीचे संचालक विश्वास पाठक, ऊर्जा दक्षता ब्युरोचे सचिव मिलिंद देवरे, अतिरिक्त महासंचालक डॉ. त्रिगुण कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, महाऊर्जासाठी येत्या काळात दोन उद्दिष्टे महत्वाची आहेत. सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सौर ऊर्जेचा वापर करण्याला गती द्यावी लागेल. प्रधानमंत्री सुर्यघर योजना यशस्वी झाली असून त्या योजनेशी संलग्न असलेली राज्याची योजना सुरू करून पहिल्या टप्प्यात १०० युनिटपर्यंतचे सर्व ग्राहक आणि दुसऱ्या टप्प्यात ३०० युनिटपर्यंतचे सर्व ग्राहक सौर ऊर्जेवर आणायचे आहेत. ३०० युनिटपर्यंत वीजेचा वापर करणाऱ्या ग्राहकांचे वीज देयक शून्यावर यावे, असा प्रयत्न आहे. ही दोन्ही उद्दिष्टे पूर्ण करण्यासंदर्भात महाऊर्जा हे काम चांगल्यारितीने करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अपारंपरिक क्षेत्रात महाराष्ट्राची भरारी

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, हरित इमारतीसाठी असलेली सर्व मानके पूर्ण करणारी, निसर्गाचा पूर्णपणे उपयोग करणारी, ऊर्जेची बचत करणारी आणि आवश्यक असणारी ऊर्जा १०० टक्के निर्माण करणारी, महाऊर्जाची ही नवी इमारत हरित इमारतीचा उत्तम नमुना आहे. ऊर्जा बचतीच्या क्षेत्रात आणि अपारंपरिक (पान २ वर...)

# चंद्रहार पाटील यांचे अखेर ठरले, ठाकरे सेनेला रामराम, सरकारसोबत जाणार



सांगली : डबल महाराष्ट्र केसरी आणि ठाकरे गटाचे नेते चंद्रहार पाटील यांचे अखेर ठरले आहे, त्यांनी ठाकरे सेनेला रामराम ठोकला असून महायुती सरकारसोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे. सोशल मीडिया अकाउंट एक्स वरून त्यांनी हा निर्णय जाहीर केला आहे. यामुळे ठाकरे सेनेला मोठा हादरा बसणार आहे.

चंद्रहार पाटील यांनी सोशल मिडिया प्लॅटफॉर्म फेसबुकवर पोस्ट केली. यामध्ये त्यांनी लिहिले की, राज्यातील क्रीडा क्षेत्राममध्ये काम करत असताना, बऱ्याच त्रुटी, अडचणी, गैरप्रकार मी अनुभवलेले आहेत. अशा बाबींविरुद्ध मी वेळोवेळी आवाज देखील उठवला आहे. परंतु, प्रत्यक्ष शासन सहभागाशिवाय असे प्रश्न मार्गी लागणे कठीण आहे. म्हणून क्रीडा क्षेत्रामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी व सामाजिक, राजकीय क्षेत्रात काम करण्यासाठी, मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी सरकार सोबत जाण्याचा निर्णय घेतलेला आहे, असं चंद्रहार पाटील म्हणाले.

चंद्रहार पाटील सोमवारी ठाण्यात एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. ठाकरेंच्या मशालीची साथ सोडून धनुष्यबाण हातात घेणार आहेत. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री उदय सामंत, मंत्री संजय शिरसाट, मंत्री शंभूराज देसाई, मंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री प्रताप सरनाईक हे ही उपस्थित राहणार आहेत.

## संबंधित यंत्रणाना कार्यक्रम यशस्वीतेसाठी केल्या मार्गदर्शक सूचना

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून सोलापूर ते गोवा विमानसेवा उद्घाटन कार्यक्रम स्थळाची पाहणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका):- सोलापूर विमानतळ येथून सोलापूर ते गोवा या विमानसेवेचा शुभारंभ सोमवार दिनांक ९ जून २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. विमानतळ परिसरात जवळपास दीड हजार नागरिकांसाठी उभारण्यात आलेल्या शामियानाची तसेच धावपट्टी व विमानतळाची पाहणी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी करून संबंधित यंत्रणाना कार्यक्रम यशस्वीतेसाठी मार्गदर्शक सूचना दिल्या.

यावेळी आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, सोलापूर महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, उपायुक्त विजय कबाडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निवासी उपजिल्हाधिकारी सुशांत बनसोडे, उपजिल्हाधिकारी महसूल संतोषकुमार देशमुख, विमानतळ प्राधिकरण चे व्यवस्थापक चंद्रेश वंजारा, सहाय्यक व्यवस्थापक अंजनी कुमारी, अतिरिक्त आयुक्त रवी पवार, संदीप कारंजे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास गुजरे यांच्यासह अन्य सर्व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सायंकाळी विमानतळ पार्किंग एरियात उभारण्यात आलेल्या पेंडॉलची पाहणी केली तसेच व्यासपीठ व अन्य सोयीसुधाच्या अनुषंगाने प्रशासनाकडून माहिती जाणून घेतली. तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शक सूचनाही दिल्या.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मुख्यमंत्री महोदय यांच्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने विमानतळ परिसर धावपट्टी या ठिकाणी सकाळी आठ तीस ते दहा या कालावधीत होणाऱ्या कार्यक्रमाची माहिती दिली. तसेच प्रशासन व विमानतळ प्राधिकरण तसेच फ्लाय ९१ यांच्या वतीने करण्यात येत असलेल्या कामकाजाची माहिती त्यांनी दिली.



दैनिक
# यश सिद्धि न्यूज




## संपादकीय....

### संक्रमणाचा वेग भयावह

देशात करोनाने पुन्हा एकदा पाय पसरू लागला आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या ताज्या आकडेवारीनुसार, शनिवारपर्यंत भारतातील करोना रुग्णांची संख्या वाढून ६००० चा आकडा पार केला आहे. केरळमध्ये परिस्थिती गंभीर आहे, असे मंत्रालयाने म्हटले आहे. देशात गेल्या २४ तासांत ३९१ सक्रिय रुग्णांची वाढ झाली आहे. महाराष्ट्र हा सर्वाधिक रुग्णसंख्येंच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकावर आहे. गेल्या २४ तासांत देशात ४ लोकांचा मृत्यू झाला आहे. जानेवारीपासून आतापर्यंत करोनामुळे ५९ लोकांचा जीव गेला आहे. महाराष्ट्रात १८ रुग्णांचा मृत्यू झाला. यापैकी १७ जणांना इतर आजार होते. त्यामुळे महाराष्ट्र हे सर्वाधिक मृत्यू असलेले राज्य ठरले आहे. केरळमध्येही कोविडमुळे १२ रुग्णांनी आपला जीव गमावला. दिल्लीत ७ लोकांचा मृत्यू झाला आहे. गुजरातमध्ये २ लोकांचा मृत्यू झाला. कर्नाटकात ९ लोकांचा मृत्यू झाला आहे. पंजाबमध्ये २ आणि राजस्थानमध्ये १ मृत्यू झाला आहे. उत्तर प्रदेशात २ आणि बंगालमध्ये १ मृत्यू झाला आहे. केरळ राज्यात सर्वाधिक सक्रिय रुग्णसंख्या आहे. तिथे एकूण १९५० सक्रिय रुग्ण आहेत. राजधानी दिल्लीत ८९२ सक्रिय रुग्ण आहेत,गुजरातमध्ये ८२२ सक्रिय रुग्ण तर महाराष्ट्रात ६८१ सक्रिय रुग्ण आहेत. बिहारमध्ये करोनाच्या सक्रिय रुग्णांची संख्या ४९ रुग्ण आहे. तर, हरियाणात १०२ रुग्ण, आंध्र प्रदेशात ८६ रुग्ण, मध्य प्रदेशात ३९ रुग्ण, राजस्थानमध्ये १३२ रुग्ण, तामिळनाडूमध्ये १९४ रुग्ण, उत्तर प्रदेशात २१९, तर बंगालमध्ये ६९३ करोनाचे रुग्ण आढळले आहेत. उत्तराखंडमध्ये ९ करोनाचे रुग्ण आहेत. पुद्दुचेरीमध्ये १५ रुग्ण आहेत. करोना परत येत आहे, त्यामुळे सगळ्यांनी काळजी घेणे गरजेचे आहे. सरकारने दिलेल्या नियमांचे पालन करा आणि सुरक्षित राहा. मास्क वापरा आणि वेळोवेळी हात धुवा. काही लक्षणे दिसल्यास, त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या. घाबरू नका, पण सावध राहा, असे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले आहे.

# मॉडेल सोलर व्हिलेज योजना

सूर्यघर मुफ्त बिजली योजनेंतर्गत 'मॉडेल सोलर व्हिलेज' ही गावांना प्रोत्साहन देणारी योजना राबवित आहे. या योजनेविषयी ही माहिती




आपला भारत देश पर्यायाने महाराष्ट्र राज्य आणि राज्यातील गावे-घरे मोफत सोलर वीजेने ऊर्जावान करण्याचा संकल्प केंद्र व राज्य शासनाने केला आहे. अनेक नागरिक आपल्या निवासस्थानी सोलर यंत्रणा स्थापित करून वीजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाल्याची अनेक उदाहरणं आपल्या सभोवताली दिसत आहेत. याच दिशेने आणखी एक पाऊल टाकत शासन 'मॉडेल सोलर व्हिलेज' ही गावांना प्रोत्साहन देणारी योजना राबवित आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मुफ्त बिजली योजनेंतर्गत 'मॉडेल सोलर व्हिलेज' या घटकाची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनाने ९ ऑगस्ट २०२४ रोजी ज्ञापन प्रसिध्द केले आहे. त्यानुसार राज्यात ही योजना राबविण्याकरीता महाऊर्जा व महावितरणमार्फत प्रत्येक जिल्ह्यात एक गाव याप्रमाणे राज्यात २४ गावे महावितरण व १२ गावे महाऊर्जामार्फत 'मॉडेल सोलर व्हिलेज' म्हणून विकसित करण्यात येणार आहेत.

या अनुषंगाने अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांपैकी अमरावती जिल्ह्यातील एक गाव महाऊर्जामार्फत विकसित करण्यात येणार आहे. त्यासाठी अमरावती जिल्ह्यातील पाच हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत, अशी माहिती महाऊर्जाचे अमरावती विभागीय व्यवस्थापक प्रफुल तायडे यांनी दिली आहे.

पी. एम. सूर्यघर मुफ्त बिजली योजनेंतर्गत मॉडेल सोलर व्हिलेज या योजनेच्या संर्वांगीण व्यवस्थापनासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती (ऊ्‍ढउ) नुकतीच गठीत करण्यात आली असून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) हे या समितीचे सदस्य असून विभागीय महाव्यवस्थापक, महाऊर्जा हे या समितीचे सदस्य सचिव आहेत.

मॉडेल सोलर व्हिलेज योजनेसाठी गाव निवडीबाबत पुढीलप्रमाणे निकष केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय मंत्रालयाव्दारे निश्चित करण्यात आले आहेत. १) जिल्ह्यातील निवड केलेले गाव हे महसूल गाव असावे व त्याची लोकसंख्या जनगणनेनुसार किमान ५ हजारापेक्षा जास्त असावी. २) स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या गावांमध्ये स्पर्धेच्या कालावधी दरम्यान जास्तीत जास्त विविध अपारंपारिक ऊर्जा साधने/सौर उपकरणे आस्थापित करणे गरजेचे आहे. सौर उपकरणांमध्ये पी.एम. सुर्यघर योजनेंतर्गत जास्तीत जास्त घरांवर सोलर रुफ टॉप प्रकल्प उभारणी करणे तसेच पी.एम. कुसुम योजनेंतर्गत जास्तीत जास्त सौरपंप अथवा इतर विकेंद्रीत अपारंपारिक ऊर्जा प्रकल्प स्थापित करणे गरजेचे आहे. व या अनुषंगाने या सर्व अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांची क्षमता १० मेगा वॅट पर्यंत असणे अपेक्षित आहे. ३) याकरीता सी.एस.आर.निधी, विभागाचा निधी किंवा जिल्हास्तरीय निधी व इतर उपलब्ध असलेल्या निधीचा वापर करता येईल. ४) अग्रणी बँकेमार्फत वैयक्तिक लाभार्थ्याला सौर प्रकल्प उभारणीकरीता बँकेच्या पात्रता निकषानुसार कर्ज उपलब्ध होऊ शकेल. ५) स्पर्धेतील विजेत्या गावाचा सविस्तर प्रकल्प अहवाल महाऊर्जातर्फे तयार करण्यात येईल व प्राप्त होणाऱ्या एक कोटी एवढ्या केंद्रीय वित्तीय सहाय्यामधून गावाला पुढीलप्रमाणे गावातील कामे करता येतील.

गावासाठी सामुदायिक सौर प्रकल्प (बी.ई.एस.एस.) किंवा इतर प्रकल्प, एन आर एल एम बचत गटांसाठी विविध सौर प्रकल्प, गावातील शासकीय ईमारतींचे सौर विद्युतीकरण, सौर आधारित व इतर प्रकल्प, सौर कृषी पंप, इतर सौर अधारित तंत्रज्ञानावर असलेले अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प, बचत गट/प्राथमिक स्तरावरील सहकारी संस्था/डेअरी/मत्स्योद्योग प्रकल्प इत्यादी प्रकल्पासाठी ९० टक्के अर्थसहाय्य दिल्या जाणार आहे. या अनुषगांने निकषानुसार अमरावती जिल्ह्यातील पात्र असेलल्या गावांकडून १६ जून २०२५ पर्यंत प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. अधिकाधिक गावांनी पुढाकार घेऊन आपले गाव आदर्श आणि ऊर्जावान करावे. याबाबत अधिक माहितीसाठी महाऊर्जा विभागीय कार्यालय,अमरावती यांचा दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्र.०७२१ २६६१६१०/८६६९९११०११ किंवा वोशवररीरींरींळारहरीक्षर.लो या ईमेलवर संपर्क साधावा किंवा कार्यालयास प्रत्यक्ष भेट देण्यात यावी.

**संकलन**
**विभागीय माहिती कार्यालय,अमरावती**

# सर्व शासकीय कार्यालयात सौर ऊर्जेचा वापर सुरू करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

(पान १ वरून..) ऊर्जेच्या क्षेत्रात, महाराष्ट्राने चांगली कामगिरी केली आहे. गेल्या २ वर्षात देशभरात ४ लाख कृषी पंप बसाविण्यात आले असताना राज्याने अपारंपरिक ऊर्जेच्या वापरला प्रोत्साहन देत ५ लाख सौर कृषीपंप बसविले. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनीच्या माध्यमातून १६ हजार मेगा वॉट क्षमतेचे फिडर २०२६ पर्यंत सौर ऊर्जेवर परिवर्तीत करण्यात येणार आहेत. त्याचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. विभाजित पद्धतीने असलेला, आशियातील हा सर्वात मोठा प्रकल्प आहे. एकूणच सौर, पवन आणि हायड्रोजन क्षेत्रातही राज्याने भरारी घेतली असल्याचे श्री. फडणवीस म्हणाले.

**सौर ऊर्जेच्या वापरामुळे वीजेचे दर कमी होणार**

महाऊर्जाने गेल्या काही वर्षात अपारंपरिक ऊर्जा निर्माण करण्यात चांगली कामगिरी केली आहे. सौर ऊर्जेच्या निर्मितीत देशात आपण अग्रेसर आहोत. विभाजित पद्धतीने सौर ऊर्जेवर वीज निर्माण करूनही देशात आपण महत्वाचे स्थान मिळविले आहे. कुसुम योजनेच्या अंमल बजावणीतही आपण पुढे आहोत. २०२६ च्या डिसेंबरपर्यंत कृषीची संपूर्ण वीजेची मागणी सौर ऊर्जेवर परिवर्तित करू शकू. गेल्या २० वर्षात दरवर्षी वीजेचे दर ९ टक्क्याने वाढवत आहोत. २०२५ ते २०३० मध्ये दरवर्षी वीजेचे दर आपण कमी करणार आहोत.

**२०३० पर्यंत ५२ टक्के वीज अपारंपरिक स्रोताद्वारे निर्माण करणार**

सौर ऊर्जा निर्मितीसाठी येणाऱ्या समस्या दूर करण्याला प्राधान्य देत असल्याने वेगाने काम होत आहे. नुकताच रशियाच्या शासकीय कंपनीसोबत थोरियमपासून ऊर्जा निर्मितीत करार करण्यात आला असून हा करार भारतासाठी ऊर्जा क्षेत्राचे चित्र बदलणारा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कामांमुळे पर्यावरणाचा विनाश थांबविता येईल आणि २०३० पर्यंत ५० टक्के वीज अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातून निर्माण करण्याचे स्वप्नही पूर्ण होईल. २०३० पर्यंत राज्यात ५२ टक्के वीज अपारंपरिक स्रोतातून निर्माण होईल, असेही श्री.फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते महाऊर्जाच्या प्रगती अहवालाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमापूर्वी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी अन्य मान्यवरांसह अपारंपरिक उर्जेसंदर्भातील प्रदर्शनाला भेट दिली. सुरवातीला त्यांच्या हस्ते महाऊर्जा कार्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

**अशी आहे महाऊर्जा विकास अभिकरण इमारत**

महाऊर्जाच्या औंध येथील नवीन इमारतीचे बांधकाम पर्यावरण पूरक (ग्रीन बिल्डिंग), सुपर इ.सी.बी.सी. व नेट झिरो एनर्जी संकल्पना धर्तीवर करण्यात आले आहे. यामध्ये पोरोथम ब्लॉक, डबल ग्लेज्ड विंडोज, सिरॅमिक जाळी, रेडियन्ट कुलिंग सिस्टिम, अर्थ टनेल ट्युब सिस्टिम, व्हेंच्युरी इफेक्ट, टू स्टेज इव्हॉपरेशन सिस्टिम, सोला ट्युब व २९० कि.वॅ. क्षमतेचे पारेषण सलंग्न सौर संयंत्र इ. चा वापर करण्यात आला आहे.

# ह्युंदाई मोटरच्या प्रोजेक्ट H2OPE अंतर्गत गडचिरोलीतील शाळांमध्ये शुद्ध पिण्याचे पाणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम, आदिवासी आणि नक्षलग्रस्त भागातील शाळांमध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या ह्युंदाई मोटरच्या 'प्रोजेक्ट करजझए' (होप) उपक्रमाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कौतुक केले आहे.

गडचिरोली या आकांक्षित जिल्ह्याच्या दुर्गम भागातील शालेय विद्यार्थ्यांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळण्यासाठी सामाजिक उत्तरदायित्वाच्या माध्यमातून उपक्रम राबविण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मानस होता. त्यांच्या दूरदृष्टीतून आलेल्या या आवाहनाला ह्युंदाईने प्रतिसाद दिला आणि त्यांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमांतर्गत २५० शाळांमध्ये ही सुविधा सुरू झाली आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून सामाजिक कल्याण व सामुदायिक विकासासाठी घेतल्या जाणाऱ्या पुढाकाराचे अभिनंदन करीत या उपक्रमाचा अधिक विस्तार व्हावा, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली आहे.

**मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून कौतुक**

दोन टप्प्यांमध्ये राबविलेल्या या उपक्रमांतर्गत मागील वर्षी पहिल्या टप्प्यात १०० शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तर दुसऱ्या टप्प्यात यावर्षी अहेरी मध्ये ३५, भामरागड मध्ये १४, धानोरा मध्ये ३२, एटापल्ली मध्ये ३९, कोरची मध्ये १४ तर मुलचेरा मध्ये १६ अशा एकूण १५० शाळांमध्ये ही सुविधा मिळाली आहे. यामधून एकूण २६,३४१ विद्यार्थ्यांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध झाले आहे. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या स्वच्छ पाण्यामुळे त्यांचे आरोग्य आणि शिक्षण यामध्ये सकारात्मक सुधारणा होईल, असा विश्वासही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.




ह्युंदाई मोटर इंडिया लिमिटेड ही एक आघाडीची ऑटोमोबाईल उत्पादक कंपनी असून, ती शाश्वत विकासासाठी बांधिल आहे. या कंपनीने जलसंवर्धनासाठी 'झीक्षशलीं करजझए अंतर्गत सुरक्षित पिण्याच्या पाण्याच्या सुविधा वाढवणे' ही उपक्रमात्मक योजना गडचिरोली जिल्ह्यातील शाळांमध्ये राबवली आहे. हा उपक्रम ग्रामीण भागातील शासकीय शाळांमध्ये स्वच्छ आणि सुरक्षित पिण्याच्या पाण्यासाठी सुरू करण्यात आला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील २५० शाळांमध्ये हा प्रकल्प राबवला गेला असून, त्याचा हजारो विद्यार्थ्यांना लाभ झाला आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील शाळांमध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात १०० शाळा आणि दुसऱ्या टप्प्यात १५० शाळांची निवड करण्यात आली. या शाळांमध्ये रिव्हर्स ऑस्मोसिस (ठज) युनिट्स, जलशीतक, सबमर्सिबल पंप, बोअरवेल्स आणि सहा थरांची साठवण टाकी बसवण्यात आली आहे. त्याचबरोबर जलसंवर्धन आणि स्वच्छतेबाबत जागरुकता सत्रे घेण्यात आली. ह्युंदाईने सीएसव्ही (उडत) धोरणांतर्गत या प्रकल्पासाठी एकूण ५.५ कोटींची गुंतवणूक केल्याची माहिती कंपनीच्या वतीने देण्यात आली आहे.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुष्पलता डी. वाय. पाटील रुग्णालयाचे उद्‌घाटन**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन**

# राज्यात प्राथमिक आरोग्य सेवांचे जाळे निर्माण करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : प्राथमिक आरोग्यावर भर दिल्यास विशेषोपचार असलेल्या संदर्भ सेवांवरील ताण कमी होतो. त्यामुळे संपूर्ण राज्यात प्राथमिक आरोग्य सेवांचे जाळे निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. त्यादृष्टीने राज्यातील आरोग्य सेवेची पुर्नरचना करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, असे त्यांनी यावेळी नमूद केले.

मावळ तालुक्यातील आंबी-तरंगवाडी येथे पुष्पलता डी. वाय. पाटील रुग्णालयाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार सुनील शेळके, डी. वाय. पाटील विद्यापीठ, नवी मुंबईचे अध्यक्ष तथा कुलपती डॉ. विजय पाटील, डी. वाय. पाटील विद्यापीठ कोल्हापूरचे कुलपती संजय पाटील, डी. वाय. पाटील विद्यापीठ, नवी मुंबईच्या उपाध्यक्ष तथा उपकुलपती डॉ. शिवानी पाटील, माजी राज्यमंत्री संजय उर्फ बाळा भेगडे, उद्योजक रामदास काकडे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, राज्य शासनाच्या विविध योजना नीटपणे राबविण्याचे काम विद्यापीठाच्या माध्यमातून करण्यात येते. महात्मा फुले जनआरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेच्या माध्यमातून ५ लाख रुपयांपर्यंत उपचार मोफत करण्यात येतात. आरोग्यसेवेच्या क्षेत्रात विमा आणि सेवेची खात्री या माध्यमातून गरीब रुग्णांवर उपचार करण्यात येत आहेत. राज्यात प्राथमिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करण्यासह द्वितीयस्तरीय आरोग्य सेवाही बळकट करण्यात येणार आहेत. विशेषोपचारासाठी शासकीय रुग्णालये, विद्यापीठांची आणि खाजगी रुग्णालये आहेत. आरोग्याच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याचा प्रयत्न आहे. गेल्या काही वर्षात १० वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यात आले असून प्रत्येक जिल्ह्यात असे महाविद्यालय उभारण्यात येणार आहे. मुलींना वैद्यकीय शिक्षणाच्या शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णयही शासनाने घेतला. यातून शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विस्तार आणि गुणवत्ता दिसून येत आहे. विद्यापीठाने असेच कार्य सुरू करून नवनवीन ठिकाणी रुग्णालय आणि शैक्षणिक संकुल उभे करावे. त्यामागे समाजसेवेची भूमिका असल्याने शासनातर्फे सर्व सहकार्य करण्यात येईल.

महाराष्ट्रात शिक्षणाच्या क्षेत्रात मोठी क्रांती आणण्याचे आणि तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात संधी मिळवून देण्याचे काम करणाऱ्यांमध्ये डॉ. डी. वाय. पाटील हे एक अग्रणी नाव असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात उच्च शिक्षणाच्या खासगीकरणामुळे डॉ.डी. वाय.पाटील आणि त्यांच्यासारख्या व्यक्तींनी संस्था उभ्या केल्या आणि उच्च शिक्षणाचा विस्तार झाला. त्यामुळे अनेकांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. राज्यात सात खासगी विद्यापीठे या कुटुंबाने सुरू केली आणि गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रम सुरू केले. गुणवत्तेला धक्का न लावता उत्तम शिक्षण देण्यासाठी डी. वाय.पाटील यांच्या कुटुंबाने चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. या वाटचालीत पुष्पलता पाटील यांचे संस्कार महत्वाचे ठरले असल्याने त्यांचे नाव रुग्णालयाला देण्यात आले आहे.



पुष्पलता डी. वाय. पाटील रुग्णालयात अत्यंत आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या परिसराला वरदान ठरेल असे रुग्णालय उभे करण्यात आले आहे. औद्योगिक वसाहत आणि परिसरातील सामान्य माणसाला कमी खर्चात चांगले उपचार देण्यासाठी या रुग्णालयाचा फायदा होणार आहे. डॉ.विजय पाटील यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी ७० खाटा आरक्षित ठेवल्या आहेत. आतापर्यंत मुख्यमंत्री सहाय्यता निधीने संदर्भित केलेले १२ ते १५ हजार रुग्णांवर उपचार इथे करण्यात आले आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

प्रास्ताविकात कुलपती डॉ. पाटील यांनी रुग्णालयाची माहिती दिली. रुग्णालयात सर्वसामान्य नागरिकांसाठी आरोग्यसेवेच्या सर्व सुविधा पुरविण्यात येतील. केंद्र आणि राज्य शासनाने सुरू केलेल्या आयुष्मान भारत, महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा परिसरातील नागरिकांना लाभ घेता येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. रुग्णालयातील डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांनी रुग्णांना चांगली सेवा द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

पुष्पलता डी.वाय. पाटील धर्मादाय रुग्णालय ६०० खाटांचे अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त मल्टीस्पेशालिटी रुग्णालय असून येथे विविध सेवा उपलब्ध आहेत. आंबी, मावळ, तळेगाव भागातील जनतेला या रुग्णालयातून आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहेत. रुग्णालयाने स्वतःचा ऑक्सिजन प्रकल्प उभारला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



# सोलापूरच्या विकासाला नवे पंख!

## सोलापूर, धाराशिव आणि लातूर या तीन जिल्ह्यांतील किमान एक कोटी नागरिकांचे जीवनमान आणि संधींची व्याप्ती यामध्ये आमूलाग्र बदल घडणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : होटगी रोड सोलापूर विमानतळावरून तब्बल १५ वर्षांच्या प्रतिक्षेअंती नागरी विमानसेवा सुरू होणार असून, हा ऐतिहासिक क्षण सोलापूर जिल्ह्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण मराठवाड्याच्या दृष्टिकोनातून परिवर्तन घडवणारा ठरणार आहे. विशेष म्हणजे या सेवेमुळे सोलापूर, धाराशिव आणि लातूर या तीन जिल्ह्यांतील किमान एक कोटी नागरिकांचे जीवनमान आणि संधींची व्याप्ती यामध्ये आमूलाग्र बदल घडणार आहे.

**सर्वांगीण विकासाची नवी दिशा**

ही विमानसेवा केवळ प्रवासाचा एक पर्याय नाही, तर ती औद्योगिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परिवर्तनाची नांदी ठरणार आहे.

औद्योगिकदृष्ट्या, सोलापूर, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यांतील उद्योजकांना देश-विदेशातील गुंतवणूकदारांशी थेट संपर्क साधता येणार असून, लॉजिस्टिक्सचा खर्च व वेळ मोठ्या प्रमाणात वाचणार आहे.

धार्मिक पर्यटनासाठी, अक्कलकोट, पंढरपूर, तुळजापूर, औसा, आणि उस्मानाबाद सारखी श्रद्धास्थाने देशभरातील भाविकांसाठी अधिक सुलभ व सहज पोहोचण्याजोगी होतील. सांस्कृतिकदृष्ट्या, या भागातील कला, लोकसंस्कृती, हस्तकला, आणि खाद्यपरंपरा देशभर पोहोचण्याची संधी मिळेल.

सामाजिकदृष्ट्या, शिक्षण, आरोग्य व नोकरीच्या संधींसाठी मोठी मदत होईल. ग्रामीण भागातील युवक-युवतींना मोठ्या शहरांत प्रवासासाठी एक सशक्त पर्याय मिळेल.

विमानसेवेमागील संघर्ष आणि सोलापूर विकास मंचचे योगदान

या ऐतिहासिक घडामोडीमागे सोलापूर विकास मंचाचे अथक व निरंतर प्रयत्न आहेत. गेल्या पाच वर्षांपासून मंचच्या सदस्यांनी सातत्याने पाठपुरावा, जनजागृती, प्रशासनाशी बैठकांद्वारे हा प्रकल्प शक्य केला आहे. केंद्र सरकार, नागरी विमान वाहतूक मंत्रालय, ऊऋछ, आणि विमान कंपन्यांशी सलग संपर्क ठेवून हा प्रकल्प साकार करण्यासाठी त्यांनी मोठा संघर्ष केला.

आज सोलापूरकरांना स्वप्नवत वाटणारी विमानसेवा प्रत्यक्षात उभी राहिली, याचे सर्व श्रेय या टीमच्या जिद्द आणि निष्ठेला जाते.

आता पुढचे ध्येय - सोलापूरमध्ये आय.टी. पार्क

सोलापूरसाठी ही केवळ सुरुवात आहे. सोलापूर विकास मंच आता पुढचे ध्येय ठरवले आहे - सोलापूरमध्ये आय.टी. पार्क मंजूर करून घेणे. त्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून मान्यता मिळवून टि.सी.एस, इन्फोसिस, विप्रो, कॅप्जेमीनी सारख्या मोठ्या आय.टी. कंपन्यांचे युनिट्स सोलापुरात स्थापन करणे, हे पुढचे पाऊल आहे. यामुळे सोलापूरच्या हजारो तरुणांना त्यांच्या गावातच उच्च दर्जाच्या नोकऱ्यांच्या संधी मिळणार आहेत, आणि स्थलांतर रोखता येणार आहे. थोडा संघर्ष आहेच, पण जसा विमानसेवा सुरू केली, तसंच हे स्वप्नही सत्यात उतरवणारच!

> **शेवटी एवढंच म्हणावंसं वाटतं...**
>
> **स्वप्न बघणं पुरेसं नाही, त्यासाठी संघर्ष आणि कृती आवश्यक असते. सोलापूर विकास मंचने हे दाखवून दिलंय. आता सोलापूरच्या प्रगतीला कुणीही थांबवू शकत नाही!**
>
> **- विजय कुंदन जाधव**
> **सदस्य सोलापूर विकास मंच**
> **९१-९६७३३३७९८८**




# स्वेरीमध्ये 'जागतिक पर्यावरण दिन' साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग च्या कॅम्पसमध्ये वृक्षारोपण करून 'जागतिक पर्यावरण दिन' साजरा करण्यात आला.




जगभर 'जागतिक पर्यावरण दिन' साजरा केला जात असताना परंपरेनुसार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये गुरुवार, दि. ५ जून २०२५ रोजी स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या नियोजनबद्ध मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार यांच्या सहकार्याने, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण दिवस स्वच्छता व वृक्षारोपण करून जागतिक पर्यावरण दिन साजरा केला. स्वेरी कॅम्पसमध्ये विविध प्रकारच्या वृक्षांचे रोपण करून पर्यावरण संरक्षणाबाबतची जबाबदारी पार पाडण्यात आली. यावेळी विद्यार्थी व संस्थेतील कर्मचारी यांना आपल्या परिसरात झाडे लावण्यासाठी आवाहन करण्यात आले. यावेळी प्रशासन अधिष्ठाता डॉ. रणजित गिड्डे, प्रा.एस. आर.गवळी, ग्रीन टीमचे समन्वयक प्रा.कुलदीप पुकाळे, राष्टीय सेवा योजनाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.एम.एम. आवताडे, प्रा. ए.बी. चौंडे, प्रा. एस. डी. इंदलकर, प्रा. बी. टी. गडदे, इतर प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी आदी उपस्थित होते. स्वेरी अभियांत्रिकीतील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी 'जागतिक पर्यावरण दिना' चे औचित्य साधून पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने परिश्रम घेतले.

# ११२ वर कॉल करून आत्महत्येचा इशारा देणाऱ्या युवकाचे निफाड पोलिसांच्या तत्परतेने वाचले प्राण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील नांदूर मधमेश्वर येथील तरुण योगेश दाते वय ३५ रा. यांनी दि.७ जुनं रोजी सायंकाळी ८ वाजेच्य दरम्यान,११२ या नंबरवर कॉल करून आत्महत्या करण्याचा इशारा दिला होता. ही माहिती मिळताच निफाड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली तात्काळ निफाड येथून १० ते १५ मिनिटांत पोलीस पोह/भगवान सोनवणे व मंगेश चकोर घटनास्थळी धाव घेतली आणि तातडीने शोधमोहीम राबवली.

पोलीस घटनास्थळी पोहोचले असता, योगेश दाते घरात आढळून आले नाहीत. त्यामुळे परिसरात शोध घेण्यात आला. यावेळी घराजवळीलच भाबळीच्या झाडाला त्यांनी गळफास लावल्याचे आढळून आले. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी गावच्या पोलीस पाटलांच्या मदतीने दोघांनी खालून उचलून धरत पोकॉ मंगेश चकोर यांनी तात्काळ वायर च्या गाठी सोडल्या योगेश दाते यांना खाली उतरवले.झाड लहान असल्याने शरीराचा पूर्ण भार मानेवर पडल्याने त्यांना उचलून धरल्याने योगेश दाते यांचा श्वास सुरू होता. गावातील युवक भारत डांगळे यांनी पोलिसांचे मदतीने त्यांचे वाहनात टाकून रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. पोलीस हवालदार सोनवणे पोलीस शिपाई मंगेश चकोर पोलीस पाटील गोरक्षनाथ डांगळे व भारत डांगळे यांच्या मुळे तात्काळ सूचक कारवाईमुळे एक अनमोल जीव वाचला. या घटनेचे गावातुन निफाड पोलीसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# राज्यात काल मुंबई शहर जिल्ह्यात सर्वाधिक ४१ मिमी पाऊस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात मागील २४ तासांमध्ये (८ जून रोजी सकाळपर्यंत ) मुंबई शहर जिल्ह्यात सर्वाधिक ४१ मिमी पाऊस झाला आहे. तर रायगड २०.८ मिमी, धाराशिव १३.८ मिमी, ठाणे ७.९ मिमी, रत्नागिरी जिल्ह्यात ६.७ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

राज्यात कालपासून आज ८ जून रोजी सकाळपर्यंत झालेल्या पावसाची सरासरी आकडेवारी पुढीलप्रमाणे (सर्व आकडे मिलिमीटरमध्ये) : ठाणे ७.९, रायगड ,२०.८, रत्नागिरी ६.७, सिंधुदुर्ग २, पालघर ०.९, नाशिक ३.५, धुळे १.९, नंदुरबार ०.३, जळगाव ०.९, अहिल्यानगर ५.७, पुणे ३.१, सोलापूर ३.८, सातारा ३.५, सांगली २.६, कोल्हापूर ३.१, छत्रपती संभाजीनगर ५, जालना ५.३, बीड १.२, लातूर ४.५, धाराशिव १३.८, नांदेड ०.७, परभणी २.९, हिंगोली ०.५, बुलढाणा ०.८, वाशिम ०.२, यवतमाळ ०.३, वर्धा ०.१. अतिवृष्टी आणि संभाव्य पूर परिस्थिती बाबत उपाय योजना म्हणून एनडीआरएफ, एसडीआरएफ पथकांना आपत्कालीन परिस्थितीकरिता सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यात मुंबई-गोवा महामार्गावर निवळी घाटात एलपीजी गॅस टँकरची मिनीबसला धडक होऊन २९ जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. टँकरमधून गॅस गळती थांबवण्यासाठी जेएसडब्ल्यू टीम पोहचली असून गळती थांबवण्याचे काम सुरू आहे. रायगड जिल्ह्यातील एक व्यक्ती पाण्यात बुडून मृत झाली आहे. तर नाशिक जिल्हा वादळी पावसामुळे एक प्राणी, वीज पडून दोन प्राणी, धुळे व लातूर जिल्ह्यात वीज पडून प्रत्येकी दोन प्राणी आणि जळगाव जिल्ह्यात वीज पडून एक प्राणी मृत झालेले आहे. तसेच वादळी पावसामुळे जालना जिल्ह्यात दोन, जळगाव जिल्ह्यात वीज पडून एक आणि रत्नागिरी जिल्ह्यात रस्ता अपघात मध्ये २९ व्यक्ती आणि २ प्राणी जखमी झाली असल्याची माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून देण्यात आली.

# जॉय सामाजिक संस्थेकडून आदर्श संपादक प्रशांत माळवदे यांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : मुंबईतील जॉय सामाजिक संस्थेच्या १० वा वर्धापन दिनाच्या निमित्ताने राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा शनिवार दिनांक ७ जून २००५ रोजी सायंकाळी जोगेश्वरी येथील अस्मिता भवन सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी सामाजिक, शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रात कार्य करणाऱ्या विविध संस्था, संघटना, व्यक्तींचा मान्यवरांच्या शुभहस्ते प्रशांत माळवदे यांना सन्मान चिन्ह, शाल, प्रमाणपत्र, जॉय ऑफ गिविंग चे मेडल देऊन राज्यस्तरीय पुरस्कारांनी




सन्मान करण्यात आला आहे.

यावेळी विचारमंचावर प्रमुख अतिथी म्हणून जोगेश्वरी भूषण डॉ. एम. डी. वळंजू, कामगार नेते अविनाश दौंड, उच्च न्यायालयाचे वकील जगदीश जायले, समुपदेशक व मार्गदर्शक ऍड रूषीला रिबेलो, जेष्ठ पत्रकार राजेंद्र घरत, कुर्ला भूषण सत्येंद्र सामंत, डॉ महेश अभ्यंकर,संस्थापक अध्यक्ष गणेश हिरवे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ वळंजू हे होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांनी द्वीप प्रज्वलक करून तसेच योगिता हिरवे यांच्या स्वागत गीताने आणि भूषण मुळे यांच्या शिव गर्जनेने करण्यात आली. प्रास्ताविक जॉयचे संस्थापक अध्यक्ष गणेश हिरवे यांनी केले तर सूत्रसंचालन नवी मुंबई समन्वयक वैभव पाटील आणि कार्यधाक्षा असूंता डिसोझा यांनी केले.

या अगोदर ही प्रशांत माळवदे यांना समाज सेवक, सोलापूर लायन क्लब आदर्श पत्रकार, सनराईज पब्लिक स्कूलचा सनराइज पुरस्कार मिळाला आहे.

हा पुरस्कार मिळाल्याबद्दल आमदार अभिजित पाटील, सांगोलाचे आमदार बाबासाहेब, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सदस्य संभाजी शिंदे, चेअरमन कल्याणराव काळे, भाजप जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत, प्रणव परिचारक, शिंपी समाज क्षत्रिय एकसंघाचे अध्यक्ष महेश ढवळे, गणेश उंडाळे, भगवान चौगुले, हरिभाऊ शिंदे, सुनील पाटील, विजय शिंदे, सरपंच रणजीत जाधव, उपसरपंच नितीन शिंदे, सेवानिवृत्त तलाठी धोंडीराम शिंदे, शिक्षक रामचंद्र सावंत यांनी अभिनंदन केले आहे.

**महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आवाहन**

**विदर्भ पाणी परिषदेत उपस्थिती**

# पाण्याचा पुनर्वापर करीत 'झिरो डिस्चार्ज' संकल्पना प्रभावीपणे राबविण्याची गरज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर /प्रतिनिधी : नागपूर शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करीत कोराडी येथील ऊर्जा प्रकल्पाला वीज निर्मितीसाठी पाणीपुरवठा करण्यात येतो. पाण्याचा पुनर्वापर करीत झिरो डिस्चार्ज ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे. पाण्याचा पुनर्वापर करून पुढे जाण्याशिवाय पर्याय नाही. जलसंवर्धनातून विकसित महाराष्ट्र घडवू, असे प्रतिपादन महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि जनकल्याणकारी समिती नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने वनामती सभागृहात तीन दिवसीय विदर्भ पाणी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. पाणी परिषदेच्या दुसऱ्या दिवशी आयोजित यशोगाथांचे सादरीकरण या सत्रात मंत्री श्री. बावनकुळे बोलत




होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे, सांगली नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचे विलास चौथाई, श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. शिरोड कोल्हापूर येथील गणपतराव आप्पासाहेब पाटील, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त राजेंद्र गाडेकर, मुरादपूर सिंचन योजनेचे रुपेश सयाम, तामसवाडा पॅटर्नचे मिलिंद भगत, वाशिम येथील सचिन कुलकर्णी, रासेयो संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकसित महाराष्ट्र घडविण्याचा संकल्प केला आहे. भविष्यात पेयजलाचे आव्हान लक्षात घेता सर्वांनी मिळून या दिशेने काम करण्याची गरज आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलसंवर्धनाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. पाण्याचे योग्य व्यवस्थापन करीत पिण्याचे पाणी, सिंचन तसेच उद्योगासाठीच्या पाण्याचे नियोजन करण्याची गरज आहे. भविष्यातील पाण्याची समस्या लक्षात घेत सर्वांनी जल संवर्धनात पुढाकार घेण्याची गरज आहे, असे महसूल मंत्री श्री. बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले.

विदर्भातील मृतावस्थेत असलेल्या असंख्य प्रकल्पांना पुनर्जीवित करीत पाण्याचे साठवण करण्याची गरज आहे. अमरावती विभागातील सुमारे ६ हजार ६०० व नागपूर विभागातील ३ हजार असे सुमारे एकूण ९ हजारावर बंधारे दुरुस्त झाल्यास मोठ्या प्रमाणात जल व्यवस्थापन होईल. या दृष्टीने राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी आपल्या परिसरातील मृत बंधारे शोधत त्याची दुरुस्ती करीत जलसंवर्धनाच्या कार्यात मदत करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. महसूल विभागाच्या वतीने जलसंवर्धनाच्या दृष्टीने नागपूर जिल्ह्यात नाले जोड अभियान राबविले जात आहे. ५ जून ते १५ ऑगस्ट दरम्यान पर्यावरण अभियान राबविण्यात येत असून आईच्या नावाने किमान एक झाड लावण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

पाणी परिषदेत मुरादपूर येथील रुपेश सयाम यांनी 'तरंगते सौर ऊर्जा आधारित उपसा सिंचन योजना' बाबत माहिती देत यशोगाथा सादर केली. पूर्ती जलसिंचन संस्थेचे मिलिंद भगत यांनी 'तामसवाडा पॅटर्न' चे सादरीकरण केले. सचिन कुलकर्णी यांनी 'वाशिम जिल्ह्यातील पाणी व्यवस्थापन' या विषयावर माहिती दिली. वाशिम जिल्ह्यातील पांगरी महादेव या गावांमध्ये 'श्रमदान एकी- ग्रामवासीयांची एकी'तून गाव कशाप्रकारे सुजलाम सुफलाम झाले हे यशोगाथेच्या माध्यमातून सांगितले. गणपतराव आप्पासाहेब पाटील यांनी 'कृत्रिम निचरा प्रणालीद्वारे क्षारपड जमीन सुधारणा प्रकल्प' या विषयातून यशोगाथा सादर केली. विलास चौथाई यांनी 'सांगली नदी पुनर्जीवन प्रकल्प' विषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन अधिसभा सदस्य डॉ. राज मदनकर यांनी केले तर आभार सांस्कृतिक समन्वयक प्रकाश शुक्ला यांनी मानले.

**भारत निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण**

# आमची प्रक्रिया पारदर्शक आणि उत्तरदायित्वपूर्ण आहे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारत निवडणूक आयोगाने कॉंग्रेस पक्षाला २४ डिसेंबर २०२४ रोजी सविस्तर उत्तर पाठवले असून, त्यात त्यांच्या उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांवर स्पष्ट आणि तपशीलवार स्पष्टीकरण दिले आहे. या अधिकृत पत्रव्यवहारानंतरही कॉंग्रेस नेते श्री. राहुल गांधी यांनी माध्यमांद्वारे पुन्हा शंका आणि आरोप मांडल्याने आयोगाने याबाबत खेद व्यक्त केला आहे.

आयोगाने म्हटले आहे की, निवडणूक आयोग एक स्वतंत्र आणि संविधानिक संस्था आहे. कोणत्याही राजकीय पक्षाने किंवा त्याच्या नेत्याने आयोगाशी थेट पत्राद्वारे संपर्क साधल्यास, आम्ही निश्चितच उत्तर देतो आणि देत आलो आहोत.

श्री. राहुल गांधी यांनी थेट आयोगाशी संवाद साधण्याऐवजी वारंवार माध्यमांतून आरोप करणे हे आश्चर्यकारक आणि खेदजनक असल्याचे आयोगाचे मत आहे. त्यांनी माध्यमांमध्ये प्रश्न उपस्थित करण्याऐवजी थेट निवडणूक आयोगाशी पत्राद्वारे संपर्क साधावा, अशी अपेक्षा आयोगाने व्यक्त केली आहे.

निवडणूक आयोगाकडे विचारलेल्या अधिकृत प्रश्नांना उत्तर देण्याची आमची प्रक्रिया पारदर्शक आणि ठोस आहे, असेही आयोगाने स्पष्ट केले आहे.

हा संवाद माध्यमांमधून न करता थेट आयोगाशी केल्यास, लोकशाही प्रक्रियेस अधिक बळकटी मिळेल आणि संवाद अधिक परिणामकारक ठरेल, असे भारत निवडणूक आयोगाने सांगितले आहे.

# ‘जॉन डिअर’ने तंत्रज्ञान आधारित स्मार्ट मशिन्स महाराष्ट्रात तयार करून त्या जगात निर्यात कराव्या : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जॉन डिअर इंटेलिजेंट सोल्युशन्सच्या सणसवाडी प्रकल्पाचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : जॉन डिअर इंडिया या पुण्यातील प्रकल्पाने ‘मेक इन महाराष्ट्र’ला महत्व दिले असून त्यांनी कृषी क्षेत्राला समृद्ध करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना संपन्न करण्यासाठी उन्नत तंत्रज्ञानावर आधारीत स्मार्ट मशिन्सच्या उत्पादनात पुढाकार घ्यावा आणि असे तंत्रज्ञान महाराष्ट्रात तयार करून जगात निर्यात करावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

शिरुर औद्योगिक वसाहत क्षेत्रात जॉन डिअर इंटेलिजेंट सोल्युशन्सच्या सणसवाडी प्रकल्पाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पीएमआरडीएचे आयुक्त दीपक सिंगला, पोलीस अधिक्षक संदीप गिल, राजेश सिन्हा, मुकुल वासने, देवेंद्र बहीरट आदी उपस्थित होते.

महाराष्ट्रासह भारत आणि पूर्ण जगात जॉन डिअरने आपले मूल्य कायम ठेवत प्रगती साधली असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, हवामान बदलामुळे कृषी क्षेत्रावर परिणाम होत आहे. जॉन डिअरसारख्या उद्योगसंस्था नवे तंत्रज्ञान उपलब्ध करून चांगले कार्य करीत आहेत. कृत्रिम बुद्धीमत्तेचा कृषी क्षेत्रातही उपयोग सुरू झाला असून कृषी प्रक्रियेत अनुकूल बदल घडवून उत्पादनात गुणात्मक बदल घडवून आणण्यासाठी शेतकऱ्यांना त्याचा उपयोग होत आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रात त्यामुळे खूप चांगले बदल घडून येतील, असे ते म्हणाले.

नुकत्याच पुणे येथे झालेल्या कृषी हॅक्थॉनमध्ये अनेक चांगल्या कल्पना पुढे आल्या. या कल्पनांना उत्पादनात बदलून ही उन्नत तंत्रज्ञानाची क्रांती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याची क्षमता जॉन डिअरमध्ये आहे. उद्योगसंस्थेला बाजारातील महत्व कायम ठेवण्यासाठी नाविन्याचा शोध घ्यावा लागतो आणि जॉन डिअर त्यात आघाडीवर आहे. जॉन डिअरने स्मार्ट मशिन्सची ही क्रांती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी आणि स्मार्ट मशिन्स इथे तयार करून जगात निर्यात करावेत. महाराष्ट्रात संस्थेच्या विस्तारात राज्य शासन सहकार्य करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली..

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, ७० टक्के महिलांना रोजगार देण्याच्या धोरणामुळे जॉन डिअर संस्था यशस्वी ठरत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ‘मेक इन इंडिया’, ‘डिझाईन इन इंडीया’ आणि ‘मेक फॉर द वर्ल्ड’ या तिन्ही गोष्टी जॉन डिअर इंडियाने अनुसरल्या आहेत. राज्यातून ९ देशात निर्यात केली जात आहे. संस्थेचा ८० टक्के महसूल हा निर्यातीतून मिळत आहे. डिझाईनींगच्या क्षेत्रात भारतात त्यासाठी आवश्यक गुणवत्ता उपलब्ध आहे. जॉन डिअरकडून उत्पादनाचे डिझाईनींग आणि प्रमाणिकरण इथे होत आहे. जॉन डिअर इंडियाच्या केंद्रस्थानी याच बाबी आहेत. पेरणीपासून कापणी पश्चात कृषी प्रक्रियेपर्यंत



या दोन बाबी प्रत्येक उद्योगासाठी महत्वाच्या आहेत. संस्था या दोन्ही गोष्टी इथेच करीत असल्याने ती खऱ्या अर्थाने भारतीय आणि महाराष्ट्रातील संस्था आहे.

जॉन डिअरकडून शेतकऱ्यांसाठी चांगले तंत्र उपलब्ध करून देण्यात येत आहे. अन्य क्षेत्राच्या तुलनेत कृषी क्षेत्रात उन्नत तंत्रज्ञान, ऑटोमेशन आणि कृत्रिम बुद्धीमत्तेची जास्त गरज आहे. यामुळे शेतीच्या परंपरागत पद्धतीच्या कामात बदल होईल, शेतीच्या कामात अधिक अचूकता येईल आणि हे तंत्रज्ञान उत्पादन, उत्पादकता यावर परिणाम करणारे असेल.

संपूर्ण कृषीकार्यात जॉन डिअरने चांगले तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

प्रास्ताविकात राजेश सिन्हा यांनी प्रकल्पाची माहिती दिली. उद्योगांसाठी महाराष्ट्रात चांगले वातावरण असल्याने जॉन डिअर इंडियाने राज्यात पाचवी मोठी गुंतवणूक केली आहे. कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करून चांगले उत्पादन करण्यात शेतकऱ्यांना नव्या प्रकल्पामुळे मदत होणार आहे. गेल्या सात वर्षात कृषी आणि रस्ते निर्माण क्षेत्रात जॉन डिअरने भारतात योगदान दिले आहे. पुणे येथे होणारे उत्पादन पुर्णत: भारतात निर्मित असल्याचे त्यांनी सांगितले. तत्पूर्वी मुख्यमंत्री फडणवीस यांनी जॉन डिअर इंडियाच्या नव्या प्रकल्पाची पाहणी केली आणि माहिती घेतली.

# शहापूर राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्ता मेळाव्यात जोरदार इनकमिंग पक्ष प्रवेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शहापूर/विजय घनघाव : शहापूर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आज वासिंद सनई लॉन येथे कार्यकर्ता मेळावा शहापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा अनुसूचित जमाती कल्याण समितीचे अध्यक्ष दौलत दरोडा यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता. विधानसभा निवडणुकीनंतर पहिल्यांदा पक्षाचे कार्यकर्ते एकत्र पाहायला मिळाले.

गेल्या पाच सहा महिन्यानंतर एकत्र आलेल्या कार्यकर्तेना एक नवीन दिशा या मेळाव्या च्या निमित्ताने मिळाली आहे अशा आविर्भावा मध्ये मेळावा फुलून गेल्याचे चित्र पहायला मिळाले.



### स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका महायुती म्हणूनच लढणार : आ. दौलत दरोडा

यावेळी उपस्थित समुदायला मार्गदर्शन करत असताना शहापूर विधानसभा आमदार दौलत दरोडा यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्था या महायुती म्हणूनच लढल्या जातील असं वक्तव्य केले आहे.

कार्यकर्त्यांना, पदाधिकाऱ्यां पक्षातर्फे विविध पद दिली जातात, तेव्हा अशा वेळेस त्या त्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यानी आपली पत राखणं गरजेचं आहे अशा पद्धतीचं मार्गदर्शन उपस्थित समुदायला केले.

राज्याच्या विकासासाठी आणि आपल्या मतदार संघातील सर्वांगीण विकासासाठी आपण उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या सोबत गेलो आहोत असं आ.दरोडा यांनी म्हटलं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस च्या प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी त्यांच्या पातळीवर आपल्या परिसरातील प्रश्न सोडवण्यासाठी सज्ज राहीले पाहिजे, शासकीय कामात काही मदत लागली तर आ. दौलत दरोडा कायम तुमच्या सोबत आहे, असं मत दरोडा यांनी व्यक्त केले.

यावेळी विविध पदाधिकारी यांची मार्गदर्शन भाषणे पार पडली. सोबत तालुक्यातील विविध पक्षातील अनेक कार्यकर्ते यांचा पक्ष प्रवेश आज राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये पार पडला.

तर आगामी काळात शहापूर तालुक्याचे नाव ठाणे जिल्ह्यात एक नंबर ला कसं येईल यासाठी तितक्या चं ताकतीने पक्ष संघटना अधिक बळकट करू असं मत राष्ट्रवादी काँग्रेस चे शहापूर तालुका अध्यक्ष मनोहर सासे यांनी व्यक्त केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संघटन अधिक भक्कम करण्याच्या दिशेने पुढे ठोस पाऊल उचलली जातील असं सासे यांनी म्हटलं आहे.

यावेळी व्यासपीठावर आमदार दौलत दरोडा, प्रदेश सरचिटणीस श्री. किसनराव तारमळे, प्रदेश चिटणीस डी. के. विशे सर, प्रदेश पदाधिकारी रविंद्र परटोले, महिला जिल्हाध्यक्षा कल्पनाताई तारमळे, जेष्ठ नेते जैतूदादा भोईर, जिल्हा उपाध्यक्ष रामचंद्र जोशी, कांता तारमळे, तालुका अध्यक्ष मनोहर सासे, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष प्रफुल शेवाळे, स्वर्गीय लोकनेते दशरथ तिवरे यांचे चिरंजीव संजय तिवरे, महिला तालुका अध्यक्षा श्रीमती सविताताई मोरगे, युवक तालुका अध्यक्ष दिनेश चंदे, कार्याध्यक्ष नवनीत पाटील, पदाधिकारी अरुण मांजे, जितेंद्र तारमळे , शैलेश खर्डीकर, प्रकाश गोंधळी, सामाजिक न्याय चे गणेश पंडीत, अनंता भोईर यासह शहापूर तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रवादी वैद्यकीय मदत कक्षाच्या सोलापूर जिल्हा कार्याध्यक्षपदी सौ. प्रीती घाडगे यांची फेरनिवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा हीच ब्रीदवाक्य घेऊन राष्ट्रवादी वैद्यकीय मदत कक्ष संबंध महाराष्ट्रभर कार्यरत आहे. अत्यंत प्रभावी प्रमाणे वैद्यकीय मदत कक्षाने केलेल्या कामाची दखल घेऊन त्यांची सोलापूर जिल्हा वैद्यकीय मदत कक्ष कार्याध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. ही निवड पुनश्च सार्थ ठरवीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ही वैद्यकीय मदत कक्षापासून रुग्णसेवेची कटिबद्धता असल्याचे प्रतिपादन सौ प्रीती घाडगे यांनी व्यक्त केली.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रूपालि ताई चाकणकर यांच्या निर्देशांकानुसार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने राज्य संपर्कप्रमुख सचिन सरोदे यांनी दुसऱ्यांदा अधिकृत नियुक्तीपत्र ओळखपत्र देऊन निवड केली.



सौ प्रीती घाडगे यांची वैद्यकीय निर्मिती कक्षातून सोलापूर जिल्ह्याच्या कार्याध्यक्षपदी कार्यरत आहेत. रुग्णांना वैद्यकीय मदत कार्यात सक्रिय राहून काम करीत आहेत तसेच रुग्णांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहेत त्यांनी पुणे सांगली धाराशिव जिल्ह्यासह सोलापूर जिल्ह्यातील तालुका निहाय राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वैद्यकीय मदत पक्षाच्या माध्यमातून असंख्य गरजू लोकांना वैद्यकीय मदत कक्षातून मोठ्या प्रमाणावर मदत केली आहे व काँग्रेस पार्टीचे वैद्यकीय मदत पक्षाच्या माध्यमातून असंख्य रुग्णांना वैद्यकीय मदत तर अपघातातील गंभीर रुग्णांना शासकीय सर्व साई मिळवून दिलेले आहे वेळोवेळी पक्षातील वरिष्ठ तज्ञांचे मार्गदर्शन व वैद्यकीय क्षेत्रातील अधिकाऱ्यांशी समन्वयांनी कार्यरत असल्याने रुग्णांना तत्पर सेवा मिळत आहे हे काम पुण्याची समाजसेवेचे असल्याचे सव घाडगे यांनी सांगितले.

### सीएसएमटी स्थानकावरून सकाळी ६.३० वा होणार रवाना

# छत्रपती शिवाजी महाराज भारत गौरव पर्यटन रेल्वेला मुख्यमंत्री दाखवणार हिरवा झेंडा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली इतिहासाचा आणि समृद्ध वारशाचा अनुभव देणारी छत्रपती शिवाजी महाराज भारत गौरव पर्यटन रेल्वेला उद्या, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हिरवा झेंडा दाखवून रवाना करणार आहेत. उद्या ९ जून २०२५ रोजी सकाळी ६.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ही रेल्वे रवाना होणार आहे.

IRCTC, रेल्वे मंत्रालय, आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने चालवली जाणारी ही विशेष पाच दिवसांच्या या सहलीमध्ये राज्याच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ठिकाणांचा समावेश आहे. ही रेल्वे रायगड किल्ला, शिवनेरी किल्ला, प्रतापगड किल्ला, पन्हाळा किल्ला, लाल महाल, कसबा गणपती, शिवसृष्टी या ठिकाणांना भेट देणार आहे.



ही यात्रा प्रवाशांना शिवरायांच्या जीवनातील महत्त्वाच्या टप्प्यांचा आणि त्यांच्या कार्याचा अनुभव देईल. सोयीसुविधा, सांस्कृतिक समृद्धी आणि सहजतेवर भर देणारी ही रेल्वे प्रवाशांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरेल.

### ३१५ किलोमीटरचा ११ दिवसांचा पायी प्रवास

### अश्वांचे विधिवत पूजन आणि परंपरागत धार्मिक पूजा विधी

# माऊलींच्या पालखी सोहळ्यासाठी मानाच्या अश्वांचे अंकलीहून प्रस्थान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आळंदी वार्ता: कैवल्य साम्राज्य चक्रवर्ती श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या आषाढी पायी वारीसाठी कर्नाटकातील अंकली येथून मानाचे अश्व हिरा आणि मोती रविवारी (दि. ८ जून) आळंदीकडे मार्गस्थ झाले. ३१५ किलोमीटरचा ११ दिवसांचा पायी प्रवास करून हे अश्व १८ जून रोजी आळंदीत पोहोचणार असून, माऊलींच्या पालखी सोहळ्यासाठी परंपरेनुसार सेवा रुजू करतील.अंकली येथील शितोळे सरकारांच्या राजवाड्यात सकाळी १० वाजता विधिवत पूजन, आरती आणि जरीपटक्याचे समर्पण झाले. मानकरी तुकाराम कोळी यांच्याकडे जरीपटका सोपवण्यात आला. अंबाबाई मातेच्या मंदिरात पूजनानंतर हिरा व मोती या अश्वांसह वाहनांचे पूजन करण्यात आले. यानंतर ग्रामस्थ, भाविक आणि वारकऱ्यांच्या उपस्थितीत अश्व दिंडीसह आळंदीकडे मार्गस्थ झाले.

**११ दिवसांचा प्रवास आणि मुक्काम**

श्रीमंत ऊर्जितसिंह शितोळे सरकार यांनी सांगितले की, आषाढी वारीचे हे १९३ वे वर्ष आहे. पहिल्या दिवशी अश्वांचा मुक्काम मिरज येथे, तर पुढील टप्प्यांमध्ये सांगलवाडी (९ जून), इस्लामपूर पेटनाका (१० जून), वहागाव (११ जून), भरतगाव (१२ जून), भुईंज (१३ जून), सारोळा (१४ जून), शिंदेवाडी (१५ जून), पुणे (१६ व १७ जून) आणि १८ जून रोजी आळंदी येथे मुक्काम होईल. दररोज सुमारे ३० किलोमीटरचा टप्पा पूर्ण करून सायंकाळी नियोजित ठिकाणी मुक्काम होईल.



**परंपरेचा मान**

वारीदरम्यान दुपारच्या मुक्कामी माऊलींना पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला जातो. हा मान शितोळे सरकारांकडे असून, यासाठी लागणाऱ्या साहित्याचा ट्रॅक्टरही आज अंकलीतून निघाला आहे. पालखीसोबत असणाऱ्या दोन अश्वांपैकी एक स्वाराचा आणि दुसरा माऊलींचा आहे. स्वार तुकाराम कोळी गेल्या २७ वर्षांपासून वयाच्या १५व्या वर्षापासून वारीत सहभागी आहेत. तीन उभ्या आणि चार गोल रिंगणात त्यांचे कौशल्य भाविकांना आकर्षित करते.

अश्व प्रस्थान पूर्वी अंकली येथील शितोळे सरकारांच्या राजवाड्यात अश्वांचे विधिवत पूजन आणि परंपरागत धार्मिक पूजा विधी पार पडले. याप्रसंगी श्रीमंत उर्जितसिंह शितोळे सरकार, महादजीराजे शितोळे सरकार, युवराज विहानराजे शितोळे सरकार, पालखी सोहळ्याचे मालक बाळासाहेब आरफळकर, मानकरी योगीराज कुऱ्हाडे, योगेश आरु, ज्ञानेश्वर गुळुंजकर, अजित मधवे, शंकरराव कुऱ्हाडे यांच्यासह वारकरी उपस्थित होते. पूजा विधीनंतर अश्वांनी नगर प्रदक्षिणा करत आळंदीकडे प्रस्थान केले.

सन १८३२ पासून सुरू झालेल्या श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्यात शितोळे सरकारांचे अश्व आणि रात्री मुक्कामाच्या ठिकाणी देवासाठी तंबू देण्याची परंपरा अखंडितपणे सुरू आहे. या पालखी सोहळ्याच्या प्रस्थानाची तयारी जोरात सुरू असून, यंदाही लाखो वारकरी या सोहळ्यात सहभागी होण्यास उत्सुक आहेत. २० आणि २१ जुनचा मुक्काम पुणे शहरात असणार आहे. ५ जुलैला पालखी सोहळा पंढरपूरात पोहोचेल. ६ जुलैला आषाढी एकादशी आहे.